अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ/साप्र/आस्था/ १२९५
दिनांक ०८/०५/२०१८

**-: कार्यालयीन आदेश :-**

| | |
|---|---|
| विषय :- | श्री. राहुल जगताप, ई-प्रशासक, माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे रजा कालावधीतील कामकाज व्यवस्थेबाबत. |
| संदर्भ :- | १) माहिती व तंत्रज्ञान विभाग जावक क्र. मावतं/७३, दिनांक २०/०४/२०१८.<br>२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/१४७, दिनांक ०७/०५/२०१८.<br>३) माहिती व तंत्रज्ञान विभाग जावक क्र. मावतं/१३९, दिनांक ०४/०५/२०१८. |

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील 'ई-प्रशासक' माहिती व तंत्रज्ञान विभाग या पदावर कार्यरत असलेले श्री. राहुल जगताप हे दिनांक ०७/०५/२०१८ ते दिनांक ११/०५/२०१८ अखेर (दिनांक ६, १२ व १३ मे २०१८ या सार्वजनिक सुट्टीस जोडून) हक्काची रजा मिळणेस संदर्भ क्र. १ अन्वये विनंती केली आहे. त्यास मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता दिली आहे.

श्री. राहुल जगताप, ई-प्रशासक, माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे रजा कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त पदभार श्री. जयंत भोसेकर, सहाय्यक आयुक्त, कोथरूड-बावधन क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

श्री. जयंत भोसेकर, सहाय्यक आयुक्त, कोथरूड-बावधन क्षेत्रिय कार्यालय यांनी स्वत:चे पदाचे कामकाज सांभाळून ई-प्रशासक, माहिती तंत्रज्ञान विभाग या पदाचे अतिरिक्त कामकाज उपरोक्त रजा कालावधीत करावयाचे आहे.

श्री. जयंत भोसेकर, सहाय्यक आयुक्त, कोथरूड-बावधन क्षेत्रिय कार्यालय यांनी उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त पदभार स्वीकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

०९.०५.18

(शीतल तेली-उगले)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

प्रत :-
**मा. खातेप्रमुख (सर्व)**, पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी सादर . . .